**विशेष मुकदमा नं.५७९/२०११ मधील नि. वरील आदेश दिनांक ०५/०७/२०२२ रोजी दाखल केलेला अर्ज**

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी नवीन पक्षकारास प्रतिवादी क्र.३१ म्हणून दाव्यात सामील करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १ नियम १०(२) व दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला आहे.

०२. वादी यांचे थोडक्यात म्हणणे असे की, वादी व प्रतिवादी हे जवळचे नातेवाईक असून दावा मिळकती हया वडीलोपार्जित मिळकती आहेत. सदर दावा मिळकतीबाबत वादीने दावा हक्क प्रस्थापनेकरिता व निरंतरच्या मनाईहुकूमाकरिता दाखल केलेला असून तो तारीख १३/०९/२०११ रोजीपासून न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. सदर दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ यांनी वादीना अंधारात ठेवून स्वत:च्या स्वार्थाकरिता श्री.अशोक मनशाराम शर्मा यांना त्रिपक्षीय करारनामा क्रमांक ८४६७/२०२१ अन्वये दिनांक २३/०६/२०२१ रोजी करुन दिलेला आहे. सदर त्यामुळे त्यांना सदर दाव्यात पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीनी सदर त्यांना सहभागी करण्याची मागणी केली.

०३. सदर दाव्यात प्रतिवादी क्र.१ ते ७ यांचे म्हणणे असे की, सदर अर्जास दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २ नियम २ प्रमाणे नवीन पक्षकार सहभागी करुन दुरुस्ती करण्याचा हक्क राखून न ठेवल्यामुळे त्याची बाधा येते. याशिवाय सदर दाव्यास मुदतीच्या कायदयाची बाधा येत असल्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करण्यास योग्य नाही.

०४. प्रतिवादींचे म्हणणे असे की, सदर वादीने दाव्यात समाविष्ट केलेली जमीन ही हिंदु अविभक्त एकत्र कुटुंबाची नसल्याचे वादीला माहित असूनही ती समाविष्ट करुन त्यामध्ये वादीने हिश्श्याची मागणी बेकायदेशीरपणे केली आहे. सदर वादीचे वडील व प्रतिवादींचे आजोबा हे १९४७—४८ म्हणजे हिंदु वारसा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी मयत झाल्यामुळे वादीस प्रतिवादीविरुध्द दावा देण्याचा कोणताही अधिकार नाही. प्रस्तावित प्रतिवादी अशोक शर्मा यांनी यापूर्वी अनंत बाळाराम पाटील यांचेविरुध्द विशेष दिवाणी दावा क्र.२७२/२००६ न्यायालयात दाखल केला असून व त्यातील हुकूमनाम्यानुसार दरखास्त क्र.६१/२०११ ही दाखल केलेली होती. सदर प्रतिवादीचे म्हणणे असे की, मुळ दाव्यातील नि.५ वरील आदेशानंतर सदरचा भुखंड हा फक्त प्रतिवादी क्र.१ ते ७ यांचे पूर्ण मालकी व ताबा वहिवाटीचा होता. त्यामुळे सदर बाब वादीने जाणीवपूर्वक लपवून ठेवल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे.

०५. प्रतिवादी क्र.८ व ९ यांनी त्याबाबत कोणतीही हरकत नोंदवली नाही.

०६. प्रस्तावित प्रतिवादी यांचे म्हणणे असे की, ते दावा मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार असून सदर मिळकत व संभाव्य प्रतिवादी यांना या प्रकरणात समाविष्ट करण्याचे कोणतेही कारण नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार, नमूद मिळकत ही अनंत बाळाराम पाटील यांचे कुळ हक्कातील मिळकत होती. त्यानंतर ३२ग च्या प्रक्रियेने अनंत बाळाराम पाटील हे जमीन मिळकतीचे मालक झालेले आहेत. त्यानंतर जमीन मिळकतीचे भुसंपादन सिडकोने करुन त्यांना २५० चौ.मी. क्षेत्राचा भुखंड

वाटप केला आहे. सदर मिळकतीशी वादीचा कोणताही संबंध नाही. विशेष दिवाणी दावा क्र.३७२/२००६ हा प्रस्तावित प्रतिवादींनी अनंत पाटील यांच्याविरुध्द दाखल केलेला असून त्यामध्ये तडजोडीने भुखंड हस्तांतरण प्रस्तावित प्रतिवादीना करण्याचे ठरले होते. त्याअनुषंगाने सदरचा प्लॉट नं. २५३सी, सेक्टर नं.१७, क्षेत्र २५० चौ.मी. हा भुखंड २०२१ साली त्रिपक्षीय कराराने हस्तांतरित केला आहे. सदर प्रस्तावित प्रतिवादीना तसेच त्यांच्या मालकीच्या भुखंडात दाव्यात समाविष्ट केल्यास त्यांच्यावर अन्याय होवून दाव्याचे स्वरुप बदलेल. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रस्तावित प्रतिवादीतर्फे करण्यात आली.

०७. वादी व प्रतिवादींतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. खालील मुद्‌दे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्याचे निष्कर्ष मी त्यासमोर खालील कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| | **मुद्‌दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | सदर वादी प्रस्तावित प्रतिवादी यांना दाव्यात समाविष्ट करु शकतात का? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतीम आदेशानुसार |

**<u>कारणमीमांसा</u>**

०८. **<u>मुद्‌दा क्र.१ व २ साठी</u>**

वादी व प्रतिवादींतर्फे वकिलांनी त्यांचे युक्तिवादामध्ये अर्ज व म्हणण्याच्या कथनांचा पुर्नु:च्चार केला आहे.

०९. सदर प्रकरणात वादीतर्फे अर्जासोबत प्रस्तावित प्रतिवादीबरोबर दावा प्रलंबित असताना केलेल्या कराराची प्रत दाखल केली आहे. याशिवाय, वादीचे म्हणण्यानुसार, मुळ दावा मिळकतीत संपादित जमीनीचा उल्लेख असून त्याबदल्यात दरम्यानच्या काळात मिळालेला भुखंड समाविष्ट करणे योग्य व आवश्यक आहे. सदर वादीस भुखंड संदर्भात हक्क प्रस्थापित करण्याचा अधिकार आहे किंवा नाही हा पुराव्यावर निकाली करण्याचा मुद्दा असून सध्याच्या परिस्थितीत विचारात घेता येणार नाही. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, अनंत बाळाराम पाटील यांच्याविरुध्द दाखल केलेल्या दाव्यानुसार, सदर दावा निकाली होवून त्यामध्ये दरखास्त देखील दाखल करण्यात आली होती. सदर तित्रपक्षीय करार हा दाव्याच्या हुकूमनाम्यास अनुसरुन दाखल केलेला असून वादीने त्यामध्ये हरकत घेतलेली नाही. त्यामुळे सदर मुळ संपादित मिळकत ही अनंत पाटील यांची ३२ग प्रमाणे मिळालेली मिळकत असून पुन्हा ती वादीने जाणीवपूर्वक दाव्यात दाखल केलेली आहे. सदर भुखंड व प्रस्तावित प्रतिवादी यांना दाव्यात सहभागी करु नये असा युक्तिवाद प्रतिवादी तसेच प्रस्तावित प्रतिवादीतर्फे करण्यात आला.

१०. सदर दाव्याचे अवलोकन केले असता दावा सुमारे १० वर्षांपासून प्रलंबित आहे. दरम्यानच्या काळात प्रतिवादी व प्रस्तावित प्रतिवादी यांच्यात त्रिपक्षीय करार झाल्याची बाब अभिलेखावर आणलेली आहे. सदर दाव्यात नमूद मिळकत संपादित होवून त्याच्या मोबदल्यात अर्जात नमूद केलेला भुखंड मिळालेला असल्याचे वादीने व प्रतिवादीने मान्य केलेले आहे. सदर भुखंडासंदर्भात वादीचा हक्क आहे किंवा नाही हा पुराव्याचा भाग असून सद्यपरिस्थितीत, प्रस्तावित प्रतिवादी यांना दाव्यात सामील करुन अर्जात नमूद केलेला भुखंड हा देखील सामील

करणेबाबत व त्यानुसार दुरुस्ती करणेबाबत वादीनी मंजूरी देणे योग्य आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करिता खालील आदेश पारीत करते—

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सदर वादीनी प्रस्तावित प्रतिवादी यांना दाव्यात सहभागी करुन अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत दाखल करावी.

३. दुरुस्त वादपत्राप्रमाणे प्रस्तावित प्रतिवादी यांना नोटीस पाठवावी.

AVANI ASHWIN GODSE
Digitally signed by AVANI ASHWIN GODSE
Date: 2023.04.06 15:20:44 +0530

पनवेल (अ.अ. गोडसे)
दिनांक ०६/०४/२०२३ २रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल